राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना सन २०१८-१९ पर्यंतच्या कर्जाची व्याजासह परतफेड सन २०१९-२० च्या मंजुर अनुदानातून करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-१३१९/प्र.क्र.५९/९-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१. निदेशक (वित्त) रा.स.वि.नि.,नवी दिल्ली यांचे क्र.एनसीडीसी -एॲन्डसी/नऊ(१)/आरईपी/०९/१९०६, दि.१.०७.२०१९.
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९.
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०.०५.२०१६

प्रस्तावना :-

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत विविध योजनांतर्गत राज्य शासन सहकारी संस्थाना प्रकल्पांच्या उभारणीकरीता त्या त्या योजनेच्या मंजूर वित्तीय आराखडयानुसार शासकीय भागभांडवल तसेच कर्ज उपलब्ध करुन देते. राष्ट्रीय सहकार विकास निगमामार्फत या योजनेअंतर्गत राज्य शासनास उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी राज्य शासनावर संपूर्णपणे कर्ज म्हणून गणला जातो. सन २०१८-१९ पर्यंत राज्य शासनास राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मंजूर केलेल्या कर्जापैकी, परतफेडीकरीता पात्र कर्जातील मुद्दलाची व मंजूर कर्जावरील व्याजाच्या देय हप्त्यांची परतफेड करण्याकरीता राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने संदर्भाधिन दि.१.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास सूचित केले आहे. सदर पत्रानुसार सन २०१८-१९ पर्यंत राज्य शासनास मंजूर करण्यात आलेल्या, कर्जापैकी मुद्दल रु.१७,९३,३१,६००/- व व्याज रु.६,५८,४६,५००/- असे एकूण रु.२४,५१,७८,१००/- एवढी रक्कम राष्ट्रीय सहकारी विकास निगमास अदा करण्याची विनंती शासनास केली आहे. एन.सी.डी.सी.ने प्रस्तावित केल्यानुसार दि.२०.०९.२०१९ पूर्वी रक्कम अदा केल्यास व्याजावर रु.५६,९२,६२८/- इतक्या रकमेची सूट मिळणार आहे. म्हणजेच रु.१७,९३,३१,६००/-मुद्दल व रु.६,०१,५३,८७२/- इतकी व्याजाची रक्कम अशी एकूण रु.२३,९४,८५,४७२/- इतकी रक्कम एनसीडीसीला दि.२०.०९.२०१९ पर्यंत अदा करणे आवश्यक आहे. म्हणून रुपये रु. २३,९४,८५,४७२/- (कर्जाची मुद्दल रुपये १७,९३,३१,६००/-+ व्याज रुपये ६,०१,५३,८७२/- -) इतकी रक्कम रा.स.वि.नि.ला अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

२. कोषागारात देयके पारित करताना घ्यावयाची दक्षता या विषयाबाबत दि.१०.०५.२०१६ रोजी वित्त विभागाने परिपत्रक निर्गमित केले असून त्या अनुषंगाने या प्रस्तावासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार- वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पित रकमेच्या ६०% तरतुदीच्या मर्यादेत निधी वितरण करण्यास विभागास अधिकार आहेत. वितरीत करावयाची विचाराधीन रक्कम ६० % च्या मर्यादेत नाही.

२) मंजूर निधी :- सन २०१९-२० या वर्षात कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्यासाठी रु.१९,५७,८८,०००/- व व्याजासाठी रु.७,०९,७९,०००/- अशी एकूण रु.२६,६७,६७,००० /- इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी सदर लेखाशिर्षांतर्गत कोणताही खर्च झालेला नाही.

४) विचाराधीन लेखाशिर्षांतर्गत एक वर्षापूर्वीचे कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) १२ ते १६ येथील बाबी लागू नाहीत.

राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना रु. २३,९४,८५,४७२/- इतकी रक्कम अदा करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय:-

राज्यातील सहकार विकासाकरीता राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया योजनांसाठी राज्य शासनास कर्ज मंजूर केले होते. सदरच्या कर्जाची मुद्दल रु.१७,९३,३१,६००/-(रुपये सतरा कोटी त्र्यान्नव लाख ऐकतीस हजार सहाशे फक्त) व त्यावरील व्याजाची रक्कम रु.६,०१,५३,८७२/- (रुपये सहा कोटी एक लाख त्रैपन्न हजार आठशे बाहत्तर फक्त) अशी एकूण रु.२३,९४,८५,४७२/- (रुपये तेवीस कोटी चौऱ्यान्नव लाख पंच्याऐंशी हजार चारशे बाहत्तर फक्त) इतकी रक्कम सन २०१८-१९ पर्यंत परतफेडीच्या हप्त्यापोटी राष्ट्रीय सहकारी विकास निगमाला अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च चालू आर्थिक वर्षात (२०१९-२०) खालील लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा-

कर्ज - रु. १७,९३,३१,६००/-(रुपये सतरा कोटी त्र्यान्नव लाख ऐकतीस हजार सहाशे फक्त)
मागणी क्रमांक व्ही-४
मुख्य लेखाशिर्ष
६००३ राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण
(१०८) राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे
(००)(०१) राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे
(६००३ ०२४२)
भारित-५६, कर्जाची परतफेड

व्याज- रु.६,०१,५३,८७२/- (रुपये सहा कोटी एक लाख त्रैपन्न हजार आठशे बाहत्तर फक्त)
मागणी क्रमांक व्ही-१
मुख्य लेखाशिर्ष
२०४९ व्याज प्रदाने
०१ देशांतर्गत ऋणावरील व्याज

२०० देशांतर्गत इतर ऋणावरील व्याज

(०२)(०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याज

(२०४९ १०४३)

भारित-४५, व्याज

३. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना मंजूरी केलेली उपरोल्लिखित रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून आहरण करुन निगमाला त्याचे वितरण करण्यासाठी श्री. र. गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी, रोखशाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच, श्री. सं.पु.खोरगडे, उप सचिव (९-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपरोल्लेखित रक्कम RTGS/NEFT सुविधेव्दारे राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना अदा करावयाचा असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

Name of the account	National Cooperative Development Corporation
Name of the Bank	State Bank of India
Name of the Branch	Commercial Branch, Nehru Place, Delhi
Account No.	३२१६४०५२८७४
IFSC Code	SBIN ०००४२९८

५. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी सदर रक्कम प्राप्त झाल्याची पोच महाराष्ट्र शासनास नोंदणीकृत डाकेने/ई मेलव्दारे मुद्रांकित पावती पाठवावी.

६. संदर्भाधिन क्र.२ येथील वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकातील अटींची तसेच, परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील प्रस्तावाला लागू असलेल्या अटींची पूर्तता होत असल्याचे (परिशिष्टातील अनुक्रमांक ८ येथील अट वगळून) प्रमाणित करण्यात येत आहे.

७. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३९४/२०१९/व्यय-२, दि.७.९.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१७१८०५२२६५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shilpa Dilip Gaikwad
Date: 2019.09.17 18:15:36 +05'30'

(शि. दि. गायकवाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव/सचिव (सहकार/पणन/वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. उप सचिव/वि.का.अ.(पणन/पतसंस्था/साखर/सूतगिरण्या/वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. अवर सचिव/ कक्ष अधिकारी(२-स/३-स/१-स/१६-स/१७-स/२४-स/टेक्स-१अ/ब, टेक्स-२ /टेक्स-३ /टेक्स-४), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
५. कक्ष अधिकारी (व्यय-२/अर्थोपाय/अर्थसंकल्प-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
९. सहकार, आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. संचालक, वस्त्रोद्योग , महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा) नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -३२
१४. संचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, ४ सिरी इन्स्टिटयुशनल एरिया, हौजखास नवी दिल्ली ११०००१
१५. प्रादेशिक उपसंचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, ५ बी.जे.रोड, पुणे
१६. निवडनस्ती (९-स).